32

(२०९) (५३)

ना भू २

क्र. ना.भू.२/क्षेत्र दुरूस्ती/१९९९
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमि
अभिलेख म.राज्य.यांचे कार्यालय
पुणे दिनांक २८/५/१९९९

**विषय- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे**
**कलम १०६ अन्वये क्षेत्र दुरूस्तीबाबत.**

**परिपत्रक:**

इकडील क्र.सम दिनांक १७-३-१९९९ अन्वये वरील विषयाबाबतचे परिपत्रक काढणेत आलेले होते. आता सदरचे परिपत्रकान्वये दिलेल्या सुचना या परिपत्रकान्वये आणखी स्पष्ट करण्यात येत असल्यामुळे १७-३-९९च्या परिपत्रकातील सुचना रद्द समजण्यात याव्यात.

२. जमीन धारकाकडून शेती व नगरभूमापन हद्दीतील मिळकतीचे क्षेत्र दुरूस्तीबाबत कलम १०६ अन्वये अधिक्षक भूमि अभिलेख / जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्जाची अधिक्षक भूमि अभिलेख यांनी प्रथमतः त्यांचे कार्यालयात छाननी करावी. छाननी अंती क्षेत्र दुरूस्ती आवश्यक आहे असे दिसून आल्यास सदरचे अर्ज संबंधित अधिनस्थ तालुका निरीक्षक भूमि अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी यांचेकडे जरूर त्या कागदपत्रासह प्रस्ताव सादर करणेसाठी आवश्यक त्या सूचना देवून पाठवावेत.

३. अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अर्जाचे कामी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी यांनी मूळ आलेख /अभिलेख पाहून क्षेत्र काढणेत अंकगणितीय चुकीमुळे क्षेत्रात चूक आहे काय याची खात्री करावी. अंकगणितीय चूक असल्याचे दिसून आल्यास जरूर त्या कागदपत्रासह अधिक्षक भूमि अभिलेख यांचेकडे क्षेत्र दुरूस्तीकामी प्रस्ताव सादर करावा. अशा प्रकरणी पुन्हा मोजणी करणेची आवश्यकता नाही.

४. अर्जदाराचे अर्जातील तपशिल व मूळ आलेख / आलेख पडताळणी अंती तालुका निरीक्षक भूमि अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी यांना भूमापनाची चुकीमुळे किंवा जागेवर हद्दी बरोबर आहेत परंतु नकाशात हद्द चुकीची आहे असा अर्जदार यांचे अर्जात उल्लेख असेल तर धारकाकडून नियमानुसार मोजणी फी घेऊन संबंधित मिळकतीची व त्या लगतच्या सर्व मिळकतीची एकत्रीतरित्या मोजणी करून घ्यावी. त्यानंतर त्याची तालुका निरीक्षक भूमि अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी यांनी जागेवर मोजणी कामाची तपासणी करावी व जरूर तो शेरा मोजणी नकाशावर ठेवावा. लगतच्या मिळकतीच्या हद्दी व नकाशातील हद्दी बरोबर आढळून आल्यास परंतु क्षेत्र दुरुस्ती करून मागितलेल्या मिळकतीची जागेवरील हद्द व नकाशातील हद्द यात तफावत

आढळून आल्यास मोजणी आलेखासह क्षेत्र दुरूस्तीकामी आवश्यक त्या कागदपत्रासह अधिक्षक भूमि अभिलेख यांचेकडे प्रस्ताव सादर करावा.

५. नगर भूमापन अधिकारी/ तालुका निरीक्षक भूमि अभिलेख/ यांचेकडून क्षेत्र दुरूस्तीबाबत प्रस्ताव प्राप्त झाल्यावर अधिक्षक भूमि अभिलेख यांनी सदर प्रस्तावाची पडताळणी करावी. प्रस्तावित क्षेत्र दुरुस्ती योग्य असल्यास अधिक्षक भूमि अभिलेख यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे क्षेत्र दुरुस्ती बाबत नोटीस काढणेकामी, सविस्तर टिपणी सादर करावी. जिल्हाधिकारी यांनी क्षेत्र दुरूस्ती संबंधि नोटीस काढणेकामी सादर केलेली टिपणी मान्य केल्यावर अधिक्षक भूमि अभिलेख यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६ अन्वये क्षेत्र दुरुस्ती बाबतच्या नोटीसा संबंधिताना पाठवाव्यात .

६. क्षेत्र दुरूस्तीबाबत देणेत आलेल्या नोटिसीचे तारखेनंतर साधारण पंधरा दिवसात क्षेत्र दुरुस्तीबाबत कोणतीही हरकत प्राप्त न झालेस अधिक्षक भूमि अभिलेख यांनी क्षेत्र दुरुस्तीचे आदेशाकरिता टिपणी, आदेशाचे प्रारूपासह जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावी.

७. क्षेत्र दुरुस्तीकामी देणेत आलेल्या नोटीसीनंतर पंधरा दिवसांत हरकत प्राप्त झाल्यास जिल्हाधिकारी यांनी स्वतः नियमानुसार सुनावणी घेउन त्यांच्या आद्याक्षराने आदेश पारीत करणेची व त्यांचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेची आहे.

८. मोजणीअंती जागेवरील परिस्थितीनुसार लगतच्याही मिळकतीच्या हद्दीत बदल होत असेल व हद्दीबद्दल वाद होत असेल तर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १३५ मधील तरतुदीनूसार रितसर चौकशी करून सर्व हितसंबंधिताना हजर रहाणेचा ,पुरावा सादर करण्याची संधी देवून जिल्हाधिकारी यांनी स्वतः निर्णय देणेचा आहे.

९. क्षेत्रदुरूस्तीबाबत जिल्हाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त झालेवर तालुका निरीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांनी संबंधित मिळकत पत्रिकेवर जरूर ती नोंद घ्यावी व मूळ वसलेवारमध्ये तांबडया शाईने जरूरत्या नोंदी घ्याव्यात.

सोबत नोटिस व आदेशाचा नमुना असे.

(अमिताभ चंद्र)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख.

प्रत/- जिल्हाधिकारी (सर्व)
उपसंचालक भूमि अभिलेख
अधिक्षक भूमि अभिलेख
तालुका निरीक्षक भूमि अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी
कार्यालय अधिक्षक,ना.भू. १ ते ४

ab2_(1)/w